# बीड, अंबाजोगाई, धारूर, परळीतील ११ जागांच्या निवडणुकांना स्थगिती

## राज्य निवडणूक आयोगाचा आदेश : आता सर्व उमेदवारांचे लक्ष २० डिसेंबरकडे लागले लक्ष

बीड , (दिव्य न्युज):–जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने बीड, धारूर, अंबाजोगाई आणि परळी या चार नगरपालिकांमधील एकूण ११ जागांच्या निवडणुका स्थगित केल्या आहेत. तेथे २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार असून, २१ डिसेंबरला निकाल जाहीर केला जाईल.या निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे संबंधित प्रभागातील राजकीय गणिते बदलण्याची शक्यता असून, आता सर्व उमेदवारांचे लक्ष २० डिसेंबरकडे लागले आहे. दरम्यान, आज रात्री १० वाजता प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत.




### निवडणुका स्थगित करण्याचे कारण काय ?

✼ राज्यातील अनेक नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत काही उमेदवारांच्या विरोधात न्यायालयात अपील दाखल करण्यात आले होते.

✼ निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ज्या उमेदवारांच्या अपिलावर संबंधित जिल्हा न्यायालयाने २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर निकाल दिला आहे, अशा ठिकाणी निवडणूक नियमांचे आणि वेळापत्रकाचे पालन करणे प्रशासकीय दृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे अशा जागांवरील निवडणूक प्रक्रिया स्थगित केली आहे.

✼ तसेच जर अशा न्यायालयीन प्रकरणात नगराध्यक्ष पदाचा समावेश असेल, तर त्या संपूर्ण नगर परिषदेची निवडणूक स्थगित करण्याचे आदेश आयोगाने दिले ३ आहेत. मात्र, सध्या ज्या १० जागा स्थगित केल्या आहेत, तिथे केवळ सदस्य पदांसाठीच नव्याने निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे

### कोणत्या जागांवर निवडणूक स्थगित ?

बीड: प्रभाग ३ (ब) – (१ जागा)
धारूर : प्रभाग १० (अ) – (१ जागा)
अंबाजोगाई : प्रभाग क्र. १ (ब), प्रभाग क्र. ३ (अ), प्रभाग क्र. ६ (अ) आणि प्रभाग क्र. १० (ब) – (४ जागा)
परळी : प्रभाग क्र. ९ (अ), प्रभाग क्र. १४ (ब), प्रभाग क्र. ३ (अ आणि ब),
प्रभाग क्र. ११ (ब) (५ जागा

## आज रात्री १० वाजता प्रचार तोफा थंडावणार

बीड जिल्ह्यात होणाऱ्या सहा नगरपालिका निवडणुकांचा प्रचार सोमवारी रात्री १० वाजता थंडावणार आहे. खरेतर प्रचाराची मुदत ३० नोव्हेंबरलाच संपणार होती, परंतु निवडणूक आयोगाने मतदारांना आवाहन करण्यासाठी उमेदवारांना रात्री १० वाजेपर्यंतची मुभा दिली आहे.

प्रचार थंडावल्यानंतर आता सर्व उमेदवारांना आणि त्यांच्या समर्थकांना लगेचच तयारीला लागावे लागणार आहे. मंगळवारी सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार असल्याने, निवडणूक यंत्रणेसह सर्व राजकीय पक्षांचे लक्ष मतदान केंद्रांवर केंद्रित झाले आहे. या निवडणुकीत जिल्ह्याच्या सहा पालिकांमध्ये नगराध्यक्षपदासाठी एकूण ५० उमेदवार मैदानात आहेत. तर १८६ नगरसेवक पदांसाठी तब्बल ८४० उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. भाजप, दोन्ही राष्ट्रवादीसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची असल्याने, शेवटच्या क्षणापर्यंत गुप्त रणनीतीवर भर दिला जात आहे. ३ डिसेंबरला निकाल लागणार आहे.

# अंतिम टप्प्यात प्रशासनाची लगबग; आज ३१ केंद्रांवर प्रत्यक्ष मतदान

गेवराई (दिव्य न्युज ):– नगरपरिषद निवडणुकीचा अंतिम टप्पा आज पार पडत असून शहरात निवडणुकीचे वातावरण अक्षरशः तापले आहे. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर कर्मचारी, पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची लगबग सुरू झाली. एव्हीएम, व्हीव्हीपॅट आणि मतदान साहित्याची तपासणी करून अधिकारी आपल्या–आपल्या केंद्रांकडे रवाना झाले. निवडणूक शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्ण तयारीत आहे.

शहरातील ३१ मतदान केंद्रांवर आज मतदानाची प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रत्येक केंद्रावर आवश्यक व्यवस्था, सुरक्षेची मांडणी आणि सुविधांची पाहणी काल रात्री उशिरापर्यंत करण्यात आली. विशेष म्हणजे यंदाच्या निवडणुकीत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात पिंक मतदान केंद्र उभारण्यात आले असून हे केंद्र संपूर्ण महिला कर्मचाऱ्यांद्वारे चालवले जाणार



आहे. गुलाबी सजावट, आकर्षक वातावरण आणि व्यवस्थित सुविधा यामुळे हे केंद्र मतदारांचे लक्ष वेधून घेणार आहे.या मतदारसंख्येतील वाढ शहरातील निवडणुकीचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. अनेक नवीन मतदार प्रथमच मतदानाचा अनुभव घेणार असल्याने तरुणांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

# प्लॉटसाठी वाद, रात्री नशेत सख्ख्या भावाचा खून

बीड , (दिव्य न्युज):- वडिलांच्या नावे असलेला प्लॉट मला दे, असे म्हणत मोठ्या भावाने आपल्या सख्ख्या लहान भावाच्या डोक्यात काठी मारली. हा प्रकार शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास बीड शहरातील इमामपूर रोडला घडला. सकाळी उठल्यावर जखमीला रक्ताच्या उलट्या झाल्या आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. मोठ्या भावाला विचारल्यावर आपण काही केलेच नाही, असा आव त्याने आणला. या प्रकरणात रात्री उशिरापर्यंत पेठबीड पोलिस ठाण्यात नोंद नव्हती, परंतु मोठ्या भावाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते.सचिन शहाजी फरताडे (वय ३५) असे मयताचे नाव आहे. तर शशिकांत फरताडे (वय ४४) असे आरोपीचे नाव आहे. शहाजी फरताडे यांना चार मुले आहेत. ते आचारी असून बीड शहरातील इमामपूर रोडला वास्तव्यास आहेत. शशिकांत हा दुसरा, तर सचिन सर्वात लहान मुलगा होता. तो अविवाहित होता. शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास शशिकांत हा गांजा व दारूची नशा करून घरी आला. कोणालाही काही न बोलता त्याने आई दत्ताबाई यांचा गळा धरत हातावर काठी मारली. मोठा भाऊ अशोक सोडविण्यासाठी गेल्यावर त्यांच्या डोक्यात कुऱ्हाड मारली. वडील शहाजी मदतीला धावले, तर त्यांच्याही मनगटावर काठीने मारहाण केली. एवढ्यात सचिन तेथे आला. शशिकांतने नशेत त्याच्यावरही हल्ला चढवला. एक काठी त्याच्या डोक्यात बसली. यात तो जखमी झाला होता. रविवारी सकाळी त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. पेठबीड पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा रुग्णालयात आणला. शवविच्छेदन करून तो नातेवाइकांच्या ताब्यात दिला. उशिरापर्यंत ठाण्यात नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

सचिनच्या डोक्यात काठी लागल्यानंतर थोडे रक्त निघाले. तो खाली पडल्यानंतर पाणी दिले. त्याला बरे वाटले. रुग्णालयात चल म्हणल्यावर मला काहीच झाले नाही, असे म्हणत तो घरीच थांबला. सकाळीही तो रुग्णालयात आला नाही. सकाळी ११ वाजता त्याला अचानक रक्ताच्या उलट्या झाल्या. त्यानंतर तो घरीच झोपला. नंतर उठवायला गेले, तर त्याची हालचाल बंद झाली, असे सचिनचे वडील शहाजी फरताडे यांनी सांगितले.

# स्व.गोपीनाथ मुंडे यांचा जिल्हा असल्याने बीडसाठी नेहमीच विशेष तरतूद

## कमळाला मतदान करा, बीडच्या विकासासाठी कमी पडणार नाही–मुख्यमंत्री फडणवीस



बीड (दिव्य न्युज):– मी मुख्यमंत्री असताना बीडच्या विकासासाठी कधीही भेदभाव केला नाही. पंकजाताई मुंडे पालकमंत्री होत्या. डॉ.भारतभूषण क्षीरसागर नगराध्यक्ष आणि जयदत्त क्षीरसागर आमदार असताना जिल्ह्याला भरघोस निधी दिला. स्व.गोपीनाथ मुंडे यांचा जिल्हा असल्याने बीडसाठी नेहमीच विशेष तरतूद केली. आता पुन्हा एकदा कमळाला मतदान करा, बीडच्या विकासासाठी कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बीड नगरपरिषद निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने सोमवारी (दि.१) आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. मतदानाच्या आदल्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या सभेमुळे शहरात भाजपमय वातावरण झाले असून भाजपने प्रचंड शक्तीप्रदर्शन केले. ही सभा भाजपच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी ठरली.व्यासपीठावर भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांच्यासह आ.सुरेश धस, माजी मंत्री बदामराव पंडित, केशवराव आंधळे, बाळराजे पवार, आदित्य सारडा, राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी, डॉ.योगेश क्षीरसागर, सलीम जहांगीर, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ड.सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे, गेवराईच्या उमेदवार गीताभाभी पवार, माजलगावच्या उमेदवार डॉ. संध्या मेंडके, धारूरचे उमेदवार रामचंद्र निर्मळ यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, डॉ.ज्योती घुंबरे नगराध्यक्ष झाल्यानंतर बीडसाठी अतिरिक्त पाणीपुरवठा योजना राबवली जाईल. प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवण्याचे नियोजन करण्यात येईल. नगरपरिषदेच्या हद्दवाढ भागासाठी स्वतंत्र निधी दिला जाईल. डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ. ज्योती घुंबरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व बेघर नागरिकांसाठी घरकुल योजनेचा मोठा प्रकल्प हाती घेतला जाईल. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य सरकारने सर्वसामान्यांच्या हिताच्या असंख्य योजना राबवून कोट्यवधी रुपये खर्च केले. या योजना घराघरात पोहोचवल्या. 'लाडकी बहीण' योजना सरकार असेपर्यंत सुरुच राहील. पुढील टप्प्यात महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचा कार्यक्रम राबवण्यात येणार असून पुढील वर्षात हजारो महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्या जातील. डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बचत गटांसाठी मॉल उभारण्यात येणार आहे. डॉ.ज्योती घुंबरे या उच्चशिक्षित असून त्यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषदेचा कायापालट होईल. नरेंद्र मोदी यांचे विकासाचे व्हिजन थेट बीडमध्ये राबवण्यासाठी भाजपला संधी द्या. मतदानाच्या दिवशी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. यावेळी लाडक्या बहिणीसह नागरिकांची मोठ्या संख्येने गर्दी होती. या सभेचे यशस्वी नियोजन उद्योजक गौतम कांबळे यांच्या 'विजया इव्हेंट' कंपनीने केले होते. दरम्यान, सभेला येण्यासाठी प्रत्येक प्रभागातील नागरिक उत्सुक दिसून आले, बीड शहराच्या विविध भागातून नागरिक रॅली काढून घोषणाबाजी करत सभास्थळी दाखल झाले.

### भाजपची सत्ता येताच बिंदुसरा नदीचा कायापालट करणार : पंकजाताई मुंडे

डॉ.योगेश, सारिका यांनी विधासनभा लढविली, अल्पशा मतांनी त्यांचा पराभव झाला. त्यांच्या जुन्या पक्षाने त्यांना अडचणीत आणले. त्या अडचणींमुळे या दांपत्याने भाजपमध्ये प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांना पक्षात घेऊन बीड नगरपरिषद निवडणुकीची जबाबदारी दिली. भाजपमध्ये राष्ट्रवादाला स्थान असून गुंडागर्दीला स्थान नाही. बीडसह जिल्ह्यात भाजपने नगरपरिषद निवडणुकीसाठी स्वच्छ चेहरे



दिले. बीड जिल्ह्याच्या विकासात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कायम साथ लाभली. रेल्वे, राष्ट्रीय महामार्गांचे जाळे, पाणीपुरवठा योजनांना कोट्यवधींचा निधी दिला. बिंदुसरा नदीचा कायापालट करण्याचा आपण शब्द दिला आहे. तो पूर्णत्वास नेईल. बीड जिल्ह्यात अनेक देवस्थाने, शक्तिपीठे आहेत. जिल्ह्याने देशाला स्व.गोपीनाथ मुंडे, स्व.प्रमोद महाजन यांसारखे रत्न दिले. स्व.केशरकाकू, स्व.विमलताई, रजनीताई, प्रीतमताई यांसारख्या महिलांना नेतृत्व करण्याची संधी दिली. इतक्या चांगल्या बीडला राजकारणामुळे बदनाम करण्याचं काम झालं. गल्लीपासून दिल्लीपर्यंत कमळ फुलले आहे, आता बीड नगरपरिषदेतही कमळ फुलणार आहे, असा विश्वास भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

### आता देवेंद्र फडणवीस, पंकजाताई मुंडेंनी बीडचे पालकत्व घ्यावे –डॉ.योगेश क्षीरसागर

आजपर्यंत आम्ही बीड शहराची सेवा केली. यापुढेही बदलत्या बीडचा विकास करण्यासाठी कटिबद्ध आहोत. त्यासाठी मुख्यमंत्री, पंकजाताईंची साथ लागणार आहे. बीड नगरपरिषदेमार्फत आजपर्यंत झालेल्या विकासामध्ये मुख्यमंत्री व पंकजाताईंचा मोलाचा वाटा आहे. येणाऱ्या काळातही त्यांनी बीडचे पालकत्व घ्यावे, अशी भावना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

### बीडमध्ये शतप्रतिशत भाजप व कमळ –डॉ.सारिकाताई क्षीरसागर

जुन्या पक्षात आमचे खच्चीकरण झाले. त्यामुळे आम्ही भाजपमध्ये प्रवेश केला. बीडची ब्लॅकमेलर गँग विरोधी पक्षात गेली असून, बीडची पिडा दूर झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आशीर्वादाने व पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीडमध्ये शतप्रतिशत भाजप निवडून येईल, असा विश्वास डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

### कार्यकर्त्यांच्या घोषणेला दाद देत देवेंद्र फडणवीस यांचा 'जय श्रीराम'चा नारा

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या सभेत भाजप कार्यकर्ते व समर्थकांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला होता. यावेळी एका कार्यकर्त्याने दिलेल्या घोषणेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनीही भाषण सुरू असतानाच 'जय श्रीराम'चा नारा दिला. सभास्थळी उपस्थितांनी या क्षणाला जोरदार दाद दिली.

पान १ वरून

## मराठा–मुस्लीम

चर्चा मराठा समाजात होत आहे.

बीड शहरात मराठा आणि मुस्लिम समाजाची साथ ही नेहमीच परस्पर विशासाची राहिली आहे. मराठा आरक्षणाच्या मोर्चावेळी जेव्हा मराठा समाजावर कठीण वेळ आली, तेव्हा सर्वात आधी आणि सर्वात मजबूत मदत मुस्लिम समाजाकडून मिळाली. मोर्चातील लोकांना पाणी, जेवण, व्यवस्था, सुरक्षा असे शक्य ते सर्वतोपरी मदत केली. ज्यांनी आपल्या संघर्षाच्या काळात खंबीर साथ दिली, त्यांच्यासाठी आज पुढे येणे हीच खरी परतफेड आहे. महाराष्ट्राची ओळख परस्पर मदत आणि एकतेत आहे. हीच भावना पुढेही जपणे आवश्यक आहे. बीड नगरपरिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे या मुस्लिम समाजाचे शेख मुजिब यांच्या सासुबाई आहेत. त्यांना आपण आज मदत करण्याची गरज असल्याचे मराठा समाजात बोलले जात आहे.

## बोगस मतदानासाठ

शहरातील काही आधार केंद्र, सेंतू केंद्र आणि झेरॉक्स सेंटर्सवर बनावट ओळखपत्रे तयार केली जात असल्याच्या बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. यावर तत्काळ कारवाई करत प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जर कोणत्याही केंद्रावर बनावट आधार कार्ड बनवल्याचे आढळले, तर त्या केंद्राचे मालक आणि ऑपरेटर या दोघांवरही फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. मतदान केंद्रावर 'एम–आधार'द्वारे पडताळणी होणार आहे. केवळ बनावट कार्ड बनवणाऱ्यांवरच नाही, तर तेवापरणाऱ्यांवरही प्रशासनाची करडी नजर असणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर सादर करण्यात येणाऱ्या आधार कार्डची सत्यता तपासण्यासाठी एम–आधार ॲपचा वापर केला जाणार आहे. याद्वारे आधार कार्डवरील बारकोड स्कॅन करून त्याची पडताळणी केली जाईल, यात जर कार्ड बनावट आढळले, तर संबंधित मतदारावर तत्काळ गुन्हा दाखल करण्यात येईल.

चौकट

मतदारांना प्रशासनाचे आवाहन

मतदारांनी कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी आणि सुरळीत मतदान प्रक्रियेसाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी केले आहे.मतदारांनी ओळख पटवण्यासाठी केवळ आधार कार्डवर अवलंबून न राहता मतदान करताना सोबत मतदान ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, फोटो असलेले बँक पासबुक ही कागदपत्रे आणावीत असेही त्यांनी सांगितले आहे.बोगस मतदानाला मोठा चाप बसण्याची दरम्यान, प्रशासनाच्या या निर्णयामुळे शक्यता वर्तवली जात आहे.